
ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR
3.48

ISSN 2250-169X

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# VISION
## RESEARCH REVIEW

**REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Issue - XV, Vol. - V**
**Year-VIII, Bi-Annual(Half Yearly)**
**(June 2018 To Nov. 2018)**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@ gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**
**Jyotichandra Publication**
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

**Price : ₹00/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

**Dr. E. Sivanagi Reddy**
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

**Michael Strayss,**
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

**Verena Blechinger Talcott**
Director, Dept. of History
& Cultural Studies, University of Barlin.
Bariln. (Jermany)

**Dr. Raja Reddy**
Formar , Director, N.I.M.S.
Hyderabad (A.P.)&
World Famous Neurosurgeon

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

**Dr. Arjun Jadhav**
Dept. of Egnlish,
Furgusion College,
Pune, Dist. Pune

**Dr. Sarjerao Shinde**
Principal,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S)

**DEPUTY EDITORS**

**Dr. Ashok G. Chaskar**
Head, Dept. of Egnlish,
S.P. College, Pune &
Dean, Faculty of Arts & Fine Arts, University of
Pune , Dist. Pune.

**Dr. M. Veeraprasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, Dist. Anantpur (A.P.)

**Dr. V. S. Kanwate**
Principal, Nagnath College,
Aundha (N), Dist. Hingoli(M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College, Nalegaon.
Dist. Latur.(M.S.)

**Prashant Mothe**
Dept. of English, Aadarsh College,
Omerga, Dist. Osmanabad. (M.S.)

**CO - EDITORS**

**Dr. Allabaksha Jamadar**
Chairman, BOS, Hindi, SRTMUN &
Head, Dept. of Hindi,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Murlidhar Lahade**
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed.(M.S.)

**Dr. S.B. Wadekar**
Sharadchandra Arts, Com., & Sci. College,
Naigaon (Bz), Dist. Nanded. (M.S.)

**Dr. Shivaji Vaidhya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani, Dist. Parbhani (M.S.)

8

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे कुटूंब नियोजनासंबंधी विचार

**डॉ. अरुण चांगदेव खर्डे**
अर्थशास्त्र विभाग,
शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय,
परंडा, जि. उस्मानाबाद

## Research Paper - Economics

आर्थिक विकास आणि लोकसंख्या, मानव संसाधन यांचा धनात्मक सहसंबध असतो या उलट लोकसंख्येच्या प्रमाणात भांडवल निर्मिती झाली नाही तर तो सहसंबध ऋणात्मक होतो. याचाच अर्थ असा होतो की, आर्थिक विकास हा लोकसंख्या मानव संसाधन यावर अवलंबुन असतो. म्हणजेच कर्ती लोकसंख्या, मानव संसाधन यांच्यात वाढ झाली तर आर्थिक विकासाचा दर वाढतो या उलट कमी होतो. मानव संसाधन ही आधुनिक काळात राष्ट्राची खरी संपत्ती मानत आहे. म्हणजेच श्रमशक्तीला शिक्षण, प्रशिक्षण आणि आरोग्यावरील खर्च देशाला कुशल कामगार, तंत्रज्ञ, शास्त्र, डॉक्टर, व्यवस्थापक उधोजक, प्राप्त होतात. ज्यामुळे देशाचा विकास हा वेगाने होतो.

हा विचार त्यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळा पुढे १० नोव्हेंबर १९३२ रोजी मांडलेल्या संतनिनियमाच्या उपाय योजनेचा विचार मांडताना दिसून येतो. हा विचार त्यानी प्रत्यक्षपणे मांडतांना दिसून येतो. हा विचार त्यांनी प्रत्यक्षपणे मांडला किवा त्यांचा उल्लेख केलेना नाही. परंतु त्यांनी कुंटूंबनियोजनाचे विचार मांडत असतांना. त्यांनी म्हटले आहे की, शारिरिक किंवा आर्थिकदृष्टया पंगु असलेल्या माणसांनी जन्माला घातलेल्या अपत्यांना खुप तोटा सहन करावा लागतो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दुर्बल माणसांनी जन्माला घातलेल्या संततीमुळे आई वडिलांना त्रास सहन करावा लागतोच पण समाजालाही त्रास सहन करावा लागतो. म्हणजेच ते कुटूंब देशाला कुशल कामागार, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, डॉक्टर, व्यवस्थापक, उदयोजक, देऊ शकत नाही. दुसरी बाजु अशी की, कुटूंब संख्या ही उत्पन्न साधनापेक्षा जास्त असेल तर कुटूंब सदस्यांच्या मुलभूत गरजा पुर्ण करु शकत नसल्यामुळे भावी पिढी सक्षम आणि निरोगमयी मिळु शकत नाही.

दारिद्रय निवारण आणि लोकसंख्या नियंत्रण यांचा जवळचा संहसंबध असतो असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. कुटूंब मर्यादीत करुन लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवल्याशिवाय केवळ अन्नधान्याचे उत्पादनांचे समान वाटप केल्याने टिकाऊ स्वरुपाची भौतिक उन्नती किंवा प्रगती साध्य करता येत नाही. लोकसंख्यावाढीमुळे न केवळ अन्नधान्याच्या पुरवठयावर ताण पडतो. असे नाहीतर त्याचा परिणाम शिक्षण आणि इतर सुविधांच्या पुरवठयावर होते असे प्रतिपादन केले यापुढे बाबसाहेब म्हणतात की, जोपर्यंत सरकारला बेकारी आणि दारिद्रय या समस्येवर जालिम उपाय सापडत नाही. तो पर्यंत संतती नियमनाचा स्विकार करावा असे सांगितले.

लोकसंख्यावाढ आणि जमिन उपलब्धता यामध्ये सुध्दा ऋणात्मक संहसंबध असतो असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. त्यांच्या मते लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे शेतजमिनीवर ताण पडतो व त्याचे छोटे–छोटे तुकडे पडतात. त्यामुळे शेती उत्पादन वाढीसाठी सुधारणा करता येत नाही. शेतीत वाढवा सुध्दा मिळत नाही परिणामतः शेतक–यांचे राहणीमान न सुधारता दारिद्रयाचे प्रमाण वाढत गेले. असे दिसून येते. कारण शेतीवर अतिरिक्त लोकसंख्येचा भार पडल्यामुळे त्यांची सीमांत उत्पादकता शून्य होत जाते. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात नमुद केले शेतीच्या हया दुरवस्थेमुळे ग्रामीण भागात कमालीचे दारिद्रय निर्माण होउन पौष्टिक अन्न ही मिळू शकत नाही. म्हणून डॉ. बाबसाहेब आंबेडकर म्हणतात. गरीबी कमी करण्यासाठी आणि पुरेशा प्रमाणात अन्नपुरवठा व्हावा यासाठी संततीनियमन केल्याशिवाय तरणोपाय नाही असे त्यांनी प्रतिपादन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संततीनियमनाविषयी विचार मांडले होते. त्याचा त्यावेळी भारत सरकारने स्विकार केला असता तर इटली, फ्रान्स, जर्मनी, इग्लंड, या देशासारखे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता आले असते. त्याचा परिणाम भारत विकसित राष्ट्राच्या पंगतीत गेला असता. परंतु संततीनियमन केलेतर आपल्या विशिष्ट वंशाचे, धर्माचे, किंवा भुप्रदेशाची लोकसंख्या कमी होईल. या भितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संतती नियमनाचा ठराव पास झाला नाही परंतु या संतती नियमाला अधिकृत मान्यता १९६५ ला मिळाली व त्यासाठी ७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. आज ही कर्त्या लोकसंख्येचे व्यावसायिक विभाजन खालील तक्त्यात पाहिले तर असे लक्षात येते की, अतिरिक्त लोकसंख्येमुळे प्राथमिक क्षेत्रावर जास्त भार पडलेला दिसतो.

| क्षेत्र | 1901 | 1951 | 1989 | 1991 | 2005 | 2011–12 |
|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक क्षेत्र | 71.90 | 72.10 | 68.80 | 68.80 | 56.70 | 48.90 |
| व्दितीय क्षेत्र | 12.50 | 10.70 | 13.60 | 12.70 | 18.20 | 24.30 |
| तृतीय क्षेत्र | 15.60 | 17.20 | 17.60 | 20.50 | 25.10 | 26.80 |
| एकुण | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 | 100.00 |

Economy survey 2013-14 page no 5.

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट करता येते की, आज भारताची लोकसंख्या अतिरिक्त असल्यामुळे प्राथमिक क्षेत्रावर तिचा भार जास्त दिसून येतो. त्या खालोखाल तृतीय क्षेत्र भार व्दितीय क्षेत्र होय. प्राथमिक क्षेत्रावर लोकसंख्येचा अतिरिक्त भार असल्यामुळे ग्रमीण भागातील संसाधने आणि गरजा यात विषमता निर्माण झालेली दिसते. परिणामत: दारिद्रयाचे प्रमाण प्राथमिक क्षेत्रात दिसून येते यांचे कारण एका व्यक्तीवरील अवलंबित्व भार हा १:५ ते १ : ६ असल्यामुळे ग्रामीण भागातला मानवी विकास खुंटला आहे. परंतु आर्थिक विकास होत आहे.

हा आर्थिक विकास ग्रामीण भागा पर्यंत पोहचत आहे. परंतु बाबसाहेबांना हवा असणारा मानव विकास आज ही ग्रामीण भागा पर्यंत पोहचलेला नाही. कारण मानव विकासात सर्व मानवीय निवडीचा विस्तार येतो मात्र ही निवड आर्थिक असो वा सामाजिक असो वा राजकीय असो वा सांस्कृतिक असो. असे म्हटले जाते की, व्यक्ती/कुटूंबाच्या उत्पन्नात वाढ झाल्याने मानव विकासाचा अनेक निवडीच्या पर्यायांचा विस्तार होतो. परंतु अनेक कारणामुळे तसे होत नाही. याचे पहिले कारण उत्पन्न वाटपातील विषमता त्यामुळे त्यांना निवडीचे पर्याय कमी उपलब्ध होतात. कारण उत्पन्न कमी अशा स्थितीत आर्थिक विकासाचे झिरपण होत नाही. दुसरे कारण असे की, समाज आणि शासन कर्त्यांकडून अशी राष्ट्रीय प्राधान्यता निश्चित केली जाते की, ज्यातून ग्रामीण भागातील जनतेपुढे निवडीच्या पर्यायांचा विस्तार होत नाही. त्यामुळे गरीब का तर तो गरीब आहे. म्हणून हा सिध्दांत र्नर नक्सजे १९५१ साली मांडला परंतू त्याचे व्यवस्थित विवेचन डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या संततीनियमनाच्या ठरावात १० नोव्हेबर १९३२ साली मांडले आहे.

सन १९७० ते २०१० या काळात मानव दारिद्रय निर्देशांकाचा (Human Poverty Index HPI) वापर केला जात होता. २०१० पासुन बहुआयामी दारिद्रय निर्देशांकानुसार एखादे कुटूंबांचा स्कोअर ३३.३३ टक्के किंवा यापेक्षा जास्त असेल तर ते कुटूंबाचा स्कोअर २० टक्के ते ३३.३३ टक्के च्या दरम्यान असेल तर त्याला अत्याधिक बहुआयामी दारिद्रय मानले जाते. २०१४ च्या मानव विकास अहवालात २००५–२००६ सर्व्हेक्षणानुसार वंचिततेची गहनता ५१.०१ टक्के होती. बहुआयामी दाद्रियाजवळ जगणा–यांचे प्रमाण १८.२० टक्के तर अत्याधिक बहुआयामी दारिद्रयात जगणा–या चे प्रमाण २७.८ टक्के होते. बहुआयामी दारिद्रय निर्देशांचे मूल्य ०.२८२ होते २००२ – २०१२ या काळात आंतरराष्टीय दारिद्रयरेषेनुसार जे लोक २२५० उष्मांक प्राप्त करण्यासाठी दररोज १.२५ अमेरिकन डॉलर खर्च करु शकत नाही. दारिद्रयाचे प्रमाण ३२.६८ टक्के होते तर राष्टीय दारिद्रयरेषेनुसार प्रमाण २१.९० टक्के होते. भारतातील लोकसंख्येच्या वयोरचनेनुसार १५–६४ वयोगटातील लोकसंख्या २०११ मध्ये ६५.४, २०१६ मध्ये ६७.१० आणि २०२६ मध्ये त्याचे प्रमाण ६८.४ टक्के इतके राहणार आहे. यापैकी २००२–२०१२ काळातील आकडेवारी नुसार कर्त्या लोकसंख्ये पैकी म्हणजेच ६५.४० टक्के पैकी ३२.६८ टक्के लोकसंख्या ही बहुआयामी दारिद्रय रेषेखाली जीवन जगत होती हे स्पष्ट पणे सांगता येते.

थोडक्यात सांगायचे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संततीनियमनाच्या ठरावातून अतिरिक्त

लोकसंख्या ही विकासाला कशी मारक ठरते. याचे विवेचन व्यवस्थीत केले आहे. हे सघस्थित आकडेवारीचा हवाला देवून स्पष्ट केलेले आहे. बाबसाहेब हे स्वत: एक अर्थशास्त्री होते म्हणून त्यांना संततीनियमनाची काय आवश्यकता आहे याचे वास्तव भान होते.

## संदर्भ सूची

१. श्री. पी.जे. रोहम यांनी मुंबई विधानसभेत १९३८ साली मांडलेला ठराव व त्यावरील भाषणे.
२. डॉ. आंबेडकरांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार, सुगावा प्रकाशन पुणे.
३. गांधी : प्रा. नलिनी पंडित, ग्रंथाली १९८३
४. Times of India Aug 1936
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ संपादक मंडळ दया पवार

## ज्योतिचंद्र पब्लिकेशन, लातूर.

**ISBN नंबर नुसार पुस्तक प्रकाशनाची सुवर्ण संधी**

**वैशिष्ट्ये :-**

१) विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व इतर लेखकांचे पुस्तक 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ISBN नंबर नुसार प्रकाशित करणे.
२) संशोधक, प्राध्यापक यांच्या M.Phil, Ph.D. संशोधनात्मक पुस्तकांना विशेष प्राधान्य.
३) यु.जी.सी. च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षणामध्ये कार्यरत संशोधनार्थी व प्राध्यापक यांना आपले पुस्तक ISBN नुसारच प्रकाशित करणे आवश्यक आहे. तरी, संशोधनार्थी व प्राध्यापक यांनी आपले मौलिक साहित्य ISBN नुसार प्रकाशित करून घ्यावे, ही विनंती.

**- संपर्कासाठी पत्ता -**

प्रकाशक,
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
"ग्यानदेव-पार्वती", R-9/139/6, विशाल शाळेजवळ,
एल.आय.सी. कॉलनी, प्रगती नगर, लातूर.
ता. जि. लातूर - 413531.(महाराष्ट्र),भारत
**ऑफिस फोन नं. - 02382 - 241913**
मो. नं.9423346913, 9503814000, 9637935252, 7276301000